# बाजार..



लेखक

संदीप शांताराम सुर्वे

॥ श्री ॥

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संदीप शांताराम सुर्वे

लिखित

दोन अंकी नाटक

# बाजार..

# बाजार..

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

**बाजार..** (दोन अंकी नाटक)

संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ एप्रिल २०२०

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# पात्र परिचय

मैना : वय १६

इंदू : वय २६

रामभाऊ: वय ४०

सोनाबाई: वय ४५

बज्या : वय २२

भरतशेठ: वय ३५

नानी : वय ६०

शालू : वय २५

कमळी : वय १६

नंदा : वय १८

मंदा : वय १८

गोपीनाथ: वय ४०

पोपटराव: वय ३०

इन्स्पेक्टर: वय ३५

मिनिस्टर: वय ५५

पी ए : वय ३०

गणू : वय ३५

हणम्या : वय ३५

सागरया: वय २२

भीमा : वय २५

किसन्या: वय २२

सरपंच : वय ३५

वसंता : वय ४०

सुरया : वय २५

बाबल्या: वय ३०

लालाशेठ: वय ५०

शेजारी मुलगी : वय १६

शेजारी बाप : वय १६

ढोलकीवाला: वय २५

इतर मुली-बायका:वय (१६-३५)

(५-६)



# मनोगत

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं मोठं असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी सामाजिक, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रकाशित प्रत्येक लिखाणाला **(एका रात्रीची बायको, शोधू कुठे प्रिया, फेस ऑफ, पाच एकांकिका महोत्सव, चित्रपट कथा गाणी आणि मी** ) रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

चित्रपट, मालिका, वेब सिरीज, गीते लिहिताना माझ्या लेखनाची सुरुवात ज्या एकांकिका व नाटकांनी केली त्या सर्व एकांकिका व ती सर्व नाटके माझ्यासाठी अनमोल आहेत. **“यातुनच घडलो.. यातूनच बिघडलो.. म्हणूनच मित्रांनो... तुम्ही भी घडा ना.. तुम्ही बि..घडाना.”**

नाटक लिहिताना व ती दिग्दर्शित करताना जे सुख मिळतं त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. **“माझं पहिलं प्रेम.. माझं वेड.. म्हणजे रंगभूमी...”** म्हणूनच हे नाट्यपुष्प आपणा नाट्यवेड्यांसाठी सादर.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9987311359
Sandeepsurve25@gmail.com

# <u>ओळख</u>



**संदीप शांताराम सुर्वे.**

लेखक – दिग्दर्शक - गीतकार.

नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार. कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या पात्राचा.. त्या कथेचा आनंद घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी दिलेली दाद

मिळते आणि मग अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणार्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थाने.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं..ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या अनेक नाटक, मालिका तसेच चित्रपटामधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेशजी वाडकर, आनंदजी शिंदे, सुदेशजी भोसले, शान, साधना सरगम, वैशाली माडे, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, पं. महेश राव, विदुला गौरी अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9987311359
Sandeepsurve25@gmail.com

## अंक पहिला

( **पडदा** उघडतो आणि दिसू लागते एक बैठकीचे थिएटर.. ‘ **नर्तिका लोककला केंद्र**..’ सगळी लगबग सुरु आहे. कुणी बसून पायात घुंगरू बांधत आहे तर कुणी मोकळ्या केसांना सावरू पाहत आहे. कुणी नुकतीच आंघोळ करून आलेली सुंदर तरुणी स्वतःचे नाजूक यौवन सांभाळत आपल्या रूमकडे परतत आहे. कुणी मोबाईलवर आपल्या नखरेल अंदाजात कुणाशी तरी प्रेमळ रुसवा फुगवा हाकीत आहे. कुणी नुकत्याच वयात आलेल्या मुली आपापसात मस्ती करीत आहेत. प्रत्येक जण गडबडीत आहे. बॅकग्राऊंडला एका भारदस्त पुरुषी आवाजात लोककलेच्या बदलत्या रूपाविषयी v/o (आवाज) ऐकू येत आहे.)

आवाज: एकेकाळचं करमणुकीचं साधन.. लोककला जपण्याचा आधार आता भयानक रूप धारण करू लागला आहे. कलाकारांना कलेचा विसर पडत चालला आहे आणि सुरु झालं आहे कलेचं बाजारीकरण. पोटाची खळगी भरताना लोककला जपणार्या विठाबाई नारायणगावकर... काळू बाळू पार्टी.. यांच्या अस्तित्वाला जणू तडा जाऊ लागला आहे. त्यांनी जोपासलेली.. वाढवलेली.. कलेची वेल आता विषवृक्ष बनून फोफावू पाहत आहे. एकीकडे सरकार लोककला जपण्यासाठी लोकांच्या कष्टाचा पैसा अनुदानाच्या रूपाने वाटत आहे आणि दुसरीकडे त्याच कष्टाच्या पैशांचा

वर्षाव नको त्या लोकांवर उधळला जात आहे. याच लोककलेचे बाजारीकरण करणाऱ्या.. कलेच्या नावाखाली समाज लुटणाऱ्या काही न-कलाकारांची ही कथा..या बैठकीला येऊन किती लोकांची करमणूक झाली...? किती लोकांच्या पोटांची खळगी भरली..? कि काही जण गरिबीच्या बुरख्याखाली तालेवार झाले आणि काही तालेवार म्हणजेच श्रीमंत म्हणून गणले गेलेले मातब्बर लोक धुळीला मिळाले.

( **हळूहळू स्टेजवर काळोख** पसरतो आणि ढोलकीचा ठेका ऐकू येऊ लागतो..)

( **प्रकाश...** थिएटर... स्टेजवर थिरकणाऱ्या घुंघरु बांधलेल्या पायावरून लाईट ओपन होतो. नाटकाची अनाऊंसमेंट सुरु होते. थिएटरमध्ये चालणारा नृत्याचा खेळ.. ज्यावर समोर बसलेला एक आंबट शौकीन तळीराम जो पूर्णपणे दारूच्या नशेत डुंबला आहे.. हातात दहाची नोट घेवून उडविण्याचे इशारे करीत आहे पण.. शो संपल्यावरही ती दहाची नोट मात्र त्यांच्यावर उडवायची हिम्मत न करिता आपल्याच खिशात टाकत आहे. मुरलेला मातब्बर असावा... ढोलकीच्या थापेवर थिरकणार्या मुली. गडगंज श्रीमंत..बागायतदार..पैसेवाले.. हाता गळयात कनकदेवतेची आभूषणे सजविलेले आत येऊन बसतात व समोर

होणार्या अप्सरांच्या नृत्याला पैसे उडवीत प्रतिसाद देऊ लागतात. बॅकग्राऊंडला  पुन्हा त्याच भारदस्त पुरुषी आवाजात लोककलेच्या बदलत्या रूपाविषयी  v/o (आवाज)   ऐकू येत आहे.)

आवाज:   जागेचे भाव आसमंताला भिडले आणि गावोगावी आपापली शेतजमीन विकून जन्माला आलेले नवश्रीमंत पैसा उडविण्याच्या नादात ऐय्याशी करायला जागा शोधू लागले आणि या न-कलाकारांनी लावलेल्या सापळयात अगदी सहजी अडकू लागले.

हीच आपली बैठक... जी लोककलेच्या नावाखाली गावोगावी आजही पाहायला मिळते. शहरात डान्स बार नावाची संस्कृती उदयाला आली आणि गावागावात लोककलेच्या नावाखाली हि बैठककला बहरत चालली बाजाराच्या रुपात.

( मुलींवर नोटांची उधळण होत आहे. त्यांच्या अंगावरून खाली पडणारया नोटा काहीजणी गोळा करीत आहेत.  **हळूहळू काळोख.** )

( **प्रकाश...** इंदू बंगला.. इंदूच्या बंगल्याबाहेरुन एक गरीब मुलगी कमरेवर पाण्याचा हंडा घेऊन येत असते. जीप येऊन थांबल्याचा आवाज येतो. ती वळून विंगेत पाहते. विंगेतून भरतशेठ, बाबल्या आणि

सुरया येऊन तिच्यासमोरून पुढे इंदूच्या घराकडे पाहत जातात. बंगल्यातून इंदूच्या गुणगुणण्याचा आवाज ऐकू येऊ लागतो. बंगल्यामधे इंदू गुणगुणत आरशामध्ये पाहत स्वतःला सजवीत आहे. बाजूला म्हातारी नानी बसून तोंडात पानाचा बोकाणा भरीत आहे. भरत व त्याचे मित्र बाबल्या व सुरया आत येतात. मुलगी तिथेच थांबून कान टवकारून त्यांचे बोलणे ऐकायला बाहेर थांबलेली असते. )

इंदू : (भरत आत येताच त्याला पाहून पती आला अश्या अविर्भावात.. नखर्यात..) मालक.. या.. या ना मालक... कवाची तुमचीच वाट बघून राह्यले. ( मुद्दाम नानीला रागावित..) ये नाने.. तू काय पान-बिन खावून राह्यली गं? आधी उठ.. मालकाना काय हवं, काय नको ते बघ की.

नानी : व्हय व्हय... आता आधी त्यांच्या चाय पान्याचं बघते बघ. मालक बसा तुमी... ( आपल्या नववार साडीच्या पदराने खुर्ची पुसत ) ऐकलं का मालक. इथं बसा, तुमच्या जागेवर. तुमी कसं इथं शोभून दिसता राज्यावानी. मी रोज स्वतः पुसिते ही जागा. तुला सांगते इंदे, आपल्या मालकासारखा मालक बारा गावात सापडनार नाय बघ.. काय हे देखनं रूप.. कसला हा भारी रुबाब.. मस्त. या बसा इथं. ( त्याला पदराने हवा घालू लागते व मुद्दामच विषयाला हात घालते.) यंदाच्याला पावूसपानी इथं जरा कमीच. काल तो

तालुक्यावरून मानूस आला व्हता. आपल्या घराच्या मागच्या भागात पानी लागल म्हनला दोन एकशे फुटावर. मी बोलले बरोबर बोलतोयस बाबा. पानी तर गरजेचं.. आता मी म्हातारी कुठं जानार हानडे डोक्यावरुन आनायला.. पन आता पाच पन्नास हजार कुठून आनून राहायचं बोरिंगला?( पाकिटातून पाचशे  रुपयांचं बंडल काढून भरत नानीच्या हातात देतो. आणि  नानी गहिवरते.)

नानी : पाह्यलं का इंदे ? मालक असावा तर असा.. शबूद तोंडातून बाहेर पडायची खोटी.. लगे वरचेवर उचलून धरनारा. किती हायत मालक..?

भरतशेठ :पन्नास हजार...

नानी : पाह्यलस इंदे... या म्हातारीला तरास नको म्हनून एक हाती पन्नास हजार दिलं मालकानी. ( ती भुवया उडवून इंदूला इशारा करते. बाबल्या आणि सुरया कपाळाला आठ्या पाडीत एकमेकांकडे पाहतात. बाहेर उभी असलेली मुलगी स्वतःच्या नशीबावर गालातच हसते. तितक्यात तिचा गरीब बाप तिथे येतो आणि त्याला पाहून ती विंगेत निघून जाते. तो देखील तिच्यामागून निघून जातो.)

आता उद्याच्यालाच काम सुरु करते बघ हिरीचं.. भरतशेठ सगळ्यात बेस्ट.

इंदू : नाने... नजर लावू नको माझ्या मालकाला.. जा आता आनी चाय-पान्याचं राहू दे. जेवनाचं बघ आधी.. आता देव माथ्यावरून खाली उतरायला लागलाय.. ( नानी नोटाचं बंडल घेऊन आत निघून जाते. इंदू बाबल्या आणि सुरया जवळ जाते. ) आता तुमा दोघांना पन आमंत्रन पत्रिका देऊ का बाहेर जायला..? जरा सोडा कि तुमच्या दोस्ताला आमच्याजवळ ( दोघे हसत बाहेर जातात. इंदू नखर्यात भरत जवळ जात त्याला खेटून बसते.) बॉडीगार्डच घेऊन फिरता जनू... खानार हाय का मी तुमाला..? आनी या टायमाला किती उशीर केला यायला ? आज टोटल चार महिन्यानी आलसा मालक.. आसं अजून किती वाट पाहायची आमी रोज रोज...? ( खोटं रागावित पुन्हा आरशासमोर बसते.)

भरत: आमची वाट... आनी तुमी बघता...? कश्यापायी..?

इंदू: (आरश्यातून त्याला पाहत ) आता... किती तो राग एवढ्याश्या नाकावर. खोटं वाटतं का...? कवाची वाट पाहून बसलेय. आता असं किती येळ ठेवनार मला अशी भुकेली. उपाशीच राहू का आजपन ? ( म्हणत ओठ दाताखाली दाबते आणि आपल्या नजरेने त्याला घायाळ

करीत पुन्हा त्याच्या जवळ जात त्याच्या अंगाला बिलगते.)

बसायचं का  आता... जेवायला. उपाशी पोटी कायबी सुचंना झालंय नुसतं. तुमच्या आवडीचं बनवलंय आज सगळं. तुमचा फोन आला तर काय सांगू सकाळ पासनं घरात सनच असल्यावानी वाटतंय मला..

( इतक्यात मैना आत येते. )

मैना : दाजी...

( भरतचे लक्ष समोर जाते.. आणि त्याची दृष्टी तिच्यावर खिळून राहते दरवाजात उभ्या असलेल्या नुकत्याच यौवनात प्रवेश करणाऱ्या मैनेवर. मैनाचा ढोपरापर्यंत असलेला थोडासा तोकडा स्कर्ट तिचे गोरे नितळ पाय दाखवीत आहे. आणि अंगावर चढविलेल्या पांढरया शर्ट मधून जणू तिचे बहरणारे यौवन बाहेर येण्यास आतुर झाले आहे. )

मैना : दाजी तुमी कधी आलात...?  ( म्हणत ती भरतजवळ येते आणि त्याला बिलगते. भरतच्या शरीराला जसा करंट लागल्यासारखा होतो. श्वास चढवीत तो तिच्या पाठीवरून हात फिरवीत कंबरेपर्यंत आणतो आणि त्याचा हात इंदू पकडते.)

इंदू : मैने, इथं काय करून राहिली गं तू? आता आली ना तू शाळेतून. जा आधी खावून घे दोन घास. (मैना नाराज होऊन जाऊ लागते.) तुमी बसा बघू. इथं दोन घटका निवांत बोलायला पन जागा नाय. (मैना गेल्या दिशेकडे भरत पाहत आहे.)

भरत : वयात आली मैना..? ( म्हणणाऱ्या भरतच्या डोळयात मैनाबद्दल जागृत झालेली वासना इंदू पाहते.)

इंदू: ( अगदी नखरेल अंदाजात त्याच्या जवळ येत.) शू... इतक्या दिवसांनी आलसा आनी गप्पाच ठोकनार का नुसत्या ? मला पन तुमीच वयात आनली ना? ( त्याचा हात हातात घेत आपल्या अंगावर फिरवीत ) तुमचा हा मर्दानी रांगडा स्पर्श.. जवा पन माझ्या आंगाला होतो ना? कि कसं बहरून येतं सगळं अंग. कवापासून तरसले होते तुमाला भेटायला. खरं सांगू का? नाय म्हंजे.. आज एक कुस्तीचा फड रंगुनच जावू दे दोघात. तुमच्यासोबत हरायची मज्जाच येगळी. माझं एक नंबरी बाबुराव. (तो तिला खेचून मिठीत घेतो. ) अवो, इतका का राग काढताय ? कुठं पळून जाते का मी? श्वास पन घेयाला देत नाय.. दमानं घ्या की जरा... ( ती त्याला घेऊन रुममधे जाते.)

( बंगल्याबाहेर येत बाबल्या आणि सुऱ्या बोलत आहेत.)

सुऱ्या : इंदू कसली फॉर हाय रं लेका आपल्या भरतशेटवर

बाबल्या : शेटाची फॉर. अशी हालवली तर पाच पन्नास दनकन पडतील. सगळा पैश्याचा खेळ आनी आपला भरत शेट बनला या कसायांच्या हातातला बकरा. आता नाय पाह्यलंस का हिरीच्या नावाखाली म्हातारीनं कसला कापला भरतशेटला. आरं ह्यानीच गावात चार बोरिंगी मारून दिल्यात आनी यांच्याकडं पानी नाय व्हय. हिरीसाठी पन्नास हजार...

सुऱ्या : तुला बरं नॉलेज यातलं.. लेका तू पन गुपचूप येतोस की काय इथं ?

बाबल्या : याड लागलंय का मला.. गपगुमान दोस्ती यारीच्या नावाखाली भरतशेटच्या पैशावर मज्जा मारायला मिळते ती मारायची. आपला पैसा या रांडांच्या खाली घालायला चिना दिवाना नाय मी. आनी लेका कुनी सांगावं माझा बाप येऊन इथं रात्री सजवून गेला आसल आनी मी बसायचो बैठकीला आनी सैय्याच्या जागी भैय्या म्हनत एखादी गळयात पडायची की रं माझ्या. ( दोघे हसतात.) आपली मोरी बघूनच मुतायला बसायचं... काय?

सुऱ्या : (डोळा मारीत) दुसर्याची मोरी आसल तर मग कसली मुतायची चोरी.

बाबल्या : गप की आता, आता भरतशेट आत बैठका मारीत आसल आनी आपन उगा इथं  नको ते कीर्तन खेळवीत बसलोय. बाजारात गेलो तर खरेदी करायलाच पायजे आसं काय नसतं. नुसतं फेरफटका मारन्यात पन लय मज्जा असते गड्या. डोळं बंद कर आनी आत सुरू झाल्या बैठका आन डोळ्यासमोर... आल्याचं चीज होईल लेका तुझ्या..

( दोघे हसतात. हळूहळू **काळोख..** )

(**प्रकाश...** कला केंद्र.. घुंगरू आणि ढोलकीचा आवाज येत आहे. हळूहळू प्रकाश येतो... गोपीनाथ शेठ कला केंद्रमध्ये येतात. सोबतीला वसंता आहे. थियटरमध्ये जाऊन गोपीनाथची शान अजून वाढते. प्रत्येक मुलगी त्याला आपल्याकडे बोलावीत आहे.)

पोरगी १: ओ गोपी शेट . आज इकडं या कि. आमच्याकडं  पन बघा की कवातरी.

पोरगी २: नायतर काय. इकडचं पन पानी चाखून बघा की  एकदा. परतेक हिरीची टेस्ट येगळी  असते.

वसंता : आपल्याला पन डिफरन्ट डिफरन्ट टेस्ट जाम आवडते.

पोरगी ३ : हे बघ लोंबतं. फेफरं आल्यागत मधीच बोलला फुकटराव.

पोरगी १: ( हळूच दुसर्या मुलीला ) फुकटरावाचा  चड्डीचा  खिसा भी रिकामा आनी.. चड्डीतला भी निकामा.. ( दोघी हसतात.)

पोरगी २: टांगा पलटी.. फुशारक्या तर बघ किती मारतोय.

पोरगी ३: फकस्त फुशार्क्याच.. बाकी काय मारायला लागनारा दम कुठं हाय त्याच्यापाशी. (पुन्हा दोघी हसतात. समोरून येणाऱ्या इंदूला गोपीनाथचा धक्का लागतो. दोघांची नजरानजर.)

गोपीनाथ: आता इथंच घाम काढनार का आमचा ? ( म्हणत हसत तिच्या हातावर पाच हजाराचं बंडल ठेवतो.) पाच हजाराची बैठक लाव. एकदम कडक.. कसं ? (हसतो. आणि तिच्यासोबत रुममधे जातो. )

( ढोलकीवाला येऊन चिनचिना.. करीत ढोलकी चढवीत आहे. नंदाच्या खाणाखुणा ढोलकीवाल्यासोबत सुरु आहेत. चित्रपटाची गाणी गाणे , वाजविणे सुरु आहे.  'इन्ही लोगो ने.. ले लिया दुप्पटा मेरा..' हे गाणे गात या गाण्यावर नाचणाऱ्या मुलींवर बैठकीत पैसे उडवीत गोपीनाथ सर्व मुलींना आपल्यावर फिदा करतो. बैठक संपल्यावर शेजारी बसलेल्या मुलींसोबत त्याची मजाकमस्ती सुरु होते. )

गोपीनाथ: काय मग इंदू. ये की, बस की जरा इकडं. काय मग मालक काय बोलतो तुझा? नवीन बंगला बांधून राहिलीस कि गावात. बरंय तुमचं बाबा. इकडं लोकांची वाजवा आनी गावात सोताची गाजवा.

इंदू : झालं का आता. ( तोंड वेडाविते.) बरं मी काय म्हनते. ऐकलं का? बरंच दिस झालं कोन नवीन पावनं नाय दिसलं तुमच्यासोबत. घेऊन या कि नवीन पावनं सोबत. मग मी पन आनते माझ्या मैनेला.. नुकतीच वयात आलेय.. चिरा उतरवायचा बाकी हाय अजून. पन मालक कसा तोलामोलाचा हवा. तिला तोलायला तिचा एक नंबरी मोल लावनारा हवा.

गोपीनाथ: ( तिच्या डोक्यावर दहा दहाच्या नोटांचं बंडल खाली करतो.) आसं का... मग असा बकरा आनतो तुझ्या मैनेसाठी की तू बी काय लक्षात ठेवशील.. बोलावून घे मैनेला.. असे छपन्न बकरे खिशात घेऊन फिरतो हा गोपीशेट.. आता जरा आपन पन रंगात येऊया की. बरं का, चला आता सगळे बाहेर जा की जरा. इंदूशी बोलू दे की मला.

( सगळे उठतात. तो इंदूला जवळ ओढतो. ती नखऱ्यात पदर चेहऱ्यावर घेते. तो पदर बाजूला करतो. **हळूहळू काळोख.**)

(**प्रकाश...** इंदू बंगला.. मैनेला तिचे कानातले सापडत नाहीयेत. तिची बडबड सुरू आहे. )

मैना : माझं कानातलं कुठं सापडत नायत. सकाळी तर इथं टेबलावर काढून ठेवलं व्हतं. आता काय धाड भरली गायब व्हायला.

इंदू : नीट बघ की. घरातून कुठं जातील. इथं तिथं पडून आसतील कुठंतरी. नाने, मैनेला तयार कर आता. वयात आली बघ ती आता. तिचा चिरा लावला गेला पायजे. नवीन पावने बोलावले आहेत.

नानी : मी काय कवाच बोलले व्हते कि, तुझ्यासोबत तिला बी ने. पन तूच बोलून राह्यली ना ती लहान हाय.. लहान हाय. तू घर चालवतेस.. आता तिच्या सोबतीनं तुझा थोडा भार हालका व्हईल ना.

मैना : नाने, पन मला जमल काय जीजेचं काम? शाळेत पोरीबाळी भलतंच कायबाय बोलत आसत्यात. त्या बोलतात..

नानी : ( तिचं बोलणं मधेच तोडत..) तू लक्ष नको देवू त्यांच्याकडं.. आनी आता लय झाली शाळा.. काय करायचं तिथं बाकं वाजवून.. पैसं कमवायलाच शिकतात ना लोक.. आनी शिकून पैसं कमावून मग तेच बैठकीत तुमा न शिकलेल्या

पोरींवर उडवतात. मग शिकलेला जास्त शाना कि न शिकलेला.. शानपन शिकून नाय .. घासून येतं.. तुला सांगते पोरी.. मेनकेनं एवढ्या मोठ्या विश्वामित्र ऋषीची तपश्चर्या तोडली फक्त आपल्या सुंदरतेच्या जोरावर.. तवाच आख्या विश्वाला कळालं.. स्त्रीच्या सुंदरतेपुढे सगळेच आर्यभट्ट शून्याचा शोध लावत फिरनारे.. आनी जो शून्याच्या फेर्यात अडकला तो शून्याभोवती फिरतच बसला मग आयुष्यभर..

मैना : मला नाय काय कळालं. ये जीजे, तुला कळालं काय गं..?

नानी : तिला कळालं म्हनून हा बंगला बांधला तिनं.  कळंल तुलाबी लवकरच. चल.. तयार हो. आजपासून शाळा बंद आनी तुझं काम सुरु. (इंदू नानीकडे पाहून हलकीच हसते. बज्या येतो.)

बज्या : जीजे, दहा हजार दे. मला तालुक्याला जायचंय.

नानी : टाकसाळ घेऊन बसलेय काय जीजी. पैसे उडवन्यापरी त्याच पैश्यात धंदा सुरु कर कायतरी. ( इंदू त्याला पैसे देते. तो कपाळावर आठ्या आणून नानीला पाहतो आणि निघून जातो.) माज बघ कसला मेल्याला... फुकटच्या पैश्यावर नाचतोय बाजीराव. ( ती रागाने घरात निघून जाते.)

मैना : तू नको चिंता करु जीजे, आता मी हाय ना तुझ्यासोबत कमवायला. नायतरी मलापन तसा कटाळाच आला व्हता शिकायचा. आता दोघीबी मेहनत करु.

( इंदू तिला जवळ घेते. **काळोख.**)

(**प्रकाश...** कला केंद्र.. ढोलकी चढविणार्या ढोलकीवाल्यावर कॅमेरा ओपन होतो. आजूबाजूला मुली बायका तयार होत आहेत. नाच गाण्याची प्रॅक्टीस सुरु आहे. सोनाबाई गादीवर रेलून पान खात आहे. एक मुलगी तिचे पाय चेपीत आहे. मॅनेजर पोपटराव येतो. त्या मुलीकडे पाहत गोड हसतो. सोनाबाईचे लक्ष पोपटरावाकडे जातं. )

सोनाबाई : पोपटराव मिठू मिठू नंतर करा. कालचे पैसे किती ते हातात टाका आधी. ( पोपट पैश्याचं पुडकं देतो.)

पोपट : एक लाख चौतीस हजार पाचशे हायेत पुरे. आजकाल दोन चार पार्ट्र्याकडून कमी पैसे येवू लागलेत. मी बोलून राह्यलोय त्यांना असं नाय जमनार. लई खर्च येतो थियेटर चालवायला. पैसे नाय पोचले बरोबर तर तंबू उखडून टाकू तुमच्या पार्टीचा.

(बाजूच्या पिकदाणीत थुंकून ती पोपटकडे पाहते. पोपट गप्प बसतो. इतक्यात इंदू मैनेला घेऊन येते आणि अक्काच्या पाया पडायला खुणावते. मैना अक्काच्या पाया पडते.)

सोनाबाई : आसू दे पोरी... ये माझ्या जवळ बस. ( तिला पाहत तिच्या कपाळावर मुका घेते. ) मैना ना गं ही.. किती मोठी झाली पोरगी. आग लावील बघ ही पोरगी. सांभाळून ठेव हिला. सोनाबाईच्या नजरेतून असली शंभर नंबरी सोनं कधीच सुटत नाय बघ. तू आली व्हतीस तवा पन ही सोनाबाई हेच बोलली व्हती.. आज तुझी धाकली आली.. आता इथला गल्ला वाढला पायजे बघ. पोरीची नजर काढ रातीला...( इंदू खुश होते. मॅनेजर पोपटच्या हातातल्या डब्यातला पानाचा विडा खात सोनाबाई तिथून निघून जाते. इंदू हातानी मैना ची नजर उतरवते. )

इंदू: मैने, तुला माहितेय का कोन हाय ही.? (मैना निष्पापपणे मानेने नाही म्हणते.) हि अक्का. या आख्या थियेटरची मालकीन. ती बोलली कि काळ्या दगडावरची रेघ. तू आग लावनार. पन सांभाळून.. त्या आगीची धग कधी आपल्यापर्यंत पोचता कामा नये. ( तिच्या कपाळावर मुका घेते. सगळ्या मुली तिची चौकशी करू लागतात.)

मंदा: अगं इंदू अक्का, जसं तुझ्या तोंडून ऐकलं होतं तशीच छान हाय गं तुझी मैना.

नंदा : किती गोरी हाय ही. असा रसगुल्ला वाटतोय नरम नरम.

शालू : तू हात नको लावूस बाई तिला. तुझा रंग चढला तर मग लई प्रोब्लेम होईल बघ. तुझा कलर गया तो पैसा वापिस. ( सगळे हसतात. शालू बाहेर जाते. मैनाला पाहून लाळ घोटू लागलेला थियेटरचा मॅनेजर पोपट तिथे येत शालूकडे मैना बद्दल विचारणा करतो. )

पोपट : शाले, एकदम नाजूक दिसतेय गं इंदूची मैना ? कधी घेवून जावू मी.. हिला माझ्या सोबत मिठू मिठू करायला..?

शालू : आता.. कोन चावलं बिवलं की काय तुला? थोडी कळ सोस की. एकदा का तिचा चिरा उतरला कि घेवून जा तू... आज कोनाला पाठवू ? का मीच येवू तुझा भार हलका करायला? (म्हणत त्याच्या पोटात हाताचं कोपर मारते व हसते. )

पोपट : तुला तर बघूनच जाळ पेटलाय कवाचा.

शालू : आसं का..? पोरी तरन्याताठ्या झाल्या तुमच्या पोपटराव.. पन तुमी काय झुकाला मागत नाय अजून. (ती होठ दातात घेवून हसते. पोपट मिश्यावरून हात फिरवीत असतो.)

पोपट :	एवढ्यात झुकनार नाय हा गडी.. अजून बर्याच झुकवायची ताकद हाय आपल्यात.. ( सोनाबाईचा **'पोपट..'** असा आवाज येतो. ) चल येतो मी. बरी काम पडलेत. शाले, लक्षात असू दे आपलं काम. रातीला भेट.. कसं...? ( हसून निघून जातो. )

शालू :	ये पोरींनो, आता बस झाली की बडबड.. आता जा आनी दोन तांबे घेवून या पटकन अंगावर.

मंदा :	मैने चल गं. ये नंदे अशी काय बघून राह्यली तू येड्यावानी. उरक कि पटकन. ( नंदा घाईघाईत कपडे घेते. इंदू शालूसोबत आत निघून जाते.)

मंदा:	मैने घे तुझी कापडं. आजपासून तू पन बस आमच्या संगं आंघोळीला.

( सगळ्या बाजूच्याच मोरीवर बसून कपडे उतरवू लागतात.)

नंदा:	ए बघतेस काय अशी येड्यावानी ? चल उतरव कापडं.

मैना :	म्हंजे?

मंदा: म्हंजे काय म्हंजे. कापडं काढ तुझी. आंघोळ नाय करायची का?

मैना : सगळी कापडं काढून ?

नंदा: नायतर काय कापडं घालून.

मैना : पन असं इथं सगळयांसमोर करायची आंघोळ ?

मंदा: अगं आपलं आयुष्यच नागडं. दुसर्यासमोर नागडं होन्याआधी स्वतालाच नागडं बघायला नको काय? आनी आपन आपल्यालाच लाजत बसलो तर जवा लोक आपल्याला कापडं घातलेली असताना सुद्धा.. नागडंच बघतील ना तवा काय डोळं फोडायचं का आपन त्यांचं. आता इथं आलीस तर इथल्या सवयी पन लावून घे बाई. चल पटकन आटप. आता तुला बैठकीसाठी तयार व्हायचंय.

(मैना उठते आणि एक एक कपडा काढीत इतर मुलींसोबत आंघोळ करू लागते. सुरुवातीला बावरलेली आता त्या मुलींसोबत मस्ती करीत एकमेकींच्या अंगावर थंड पाणी उडवू लागते. **हळूहळू काळोख.**)

( **प्रकाश..** मैदानात कुस्ती स्पर्धा रंगली आहे. ढोलताशे वाजत आहेत. सागऱ्या माईकवर कुस्तीबद्दल कॉमेंट्री देत आहे.)

सागऱ्या : आनी अश्या प्रकारे आपल्या कुस्तीची स्पर्धा आपल्या भोकरवाडीमध्ये आज रंगनार हाये. उदघाटनाचा सामना आपल्या भोकरवाडीचे पहेलवान सदाभाऊ बारशिंगे आनी कुरडवचे पहेलवान महीपत खराडे यांच्यामध्ये होनार आहे. आपल्या आजच्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेचे प्रायोजक आपलं उभरतं नेतृत्व बजरंगराव भंगारदिवे यांचे आगमन आता लवकरच येथे होनार आहे.

भीमा : ये सागऱ्या हागरया. लेका कसलं शेटाचं उभरतं नेतृत्व...? काय आकलेचा भाग आहे का त्याला?

सागऱ्या : ये किसन हान रे याला. लेका त्याच्या पैश्यावर आपन मज्जा मारतोय ना? मग त्याचा ताट करायला नको का ? ( पुन्हा माईकवर ) तर सगळयांनी टाळया वाजवायला तयार राहायचं आहे. आपले पहेलवान सदाभाऊ बारशिंगे यांच्या सगळया खुराकाचा खर्च.. आमच्या सगळयांच्या रात्रीच्या खुराकाचा खर्च पाहनारे असे आमचे युवा, जिगरबाज

बजरंगराव आले की आपन टाळयांचा पाऊस पाडायचा आहे आनी ढोलताश्यांचा गजर करायचा आहे.

भीमा : याच्या आयचा किडा वळवळतोय. बज्याला हा तर आज सलमान खानच बनवून राहिला की रं.

किसन : आरं ढेंग्याबाबा आला बघ. (दुरून बुलेटचा आवाज येतो. )

सागऱ्या : ढोल ताशे वाजविन्यात यावेत. टाळयांचा गजर सुरू करावा. बजरंगरावांचं आगमन झालेलं आहे. ( बुलेट थांबल्याचा आवाज येतो. बज्या सफेद शर्ट पॅन्ट आणि सफेद शूजमध्ये. सगळे त्याला स्टेजवर आणतात.) मी आमचे मित्र भीमा कुडमुडे यांना विनंती करतो की त्यांनी बजरंगरावांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करावे. ( भीमा बज्याला पुष्पगुच्छ देतो.) आता उद्घाटनाचा सामना सुरू करावा अशी मी पंचाना विनंती करतो. ( कुस्तीचा सामना सुरू होतो. मैदानाच्या दुसऱ्या अंगाला गुलाबी परकर पोलकं घातलेली कमळी येते. तिच्या हातात कवटीबॉल आहे. ती तो हळूच उडवीत आहे आणि ओठ दातात घेऊन बज्याला खुणावते. बज्या सागऱ्याला निघतो म्हणून सांगत उठतो. सागऱ्याचे लक्ष सडपातळ कमळीकडे जाते.)

सागऱ्या : कुस्तीचा सामना रंगत चाललेला आहे पन बजरंगरावांना कवटी बॉल स्पर्धेचे उद्धघाटनाचे काम नुकतेच आल्याने त्यांना आपल्यातून उठून जावे लागत आहे. कवटीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करने म्हंजे कौशल्याची गोष्ट असते बरं का. आनी आमाला खात्री आहे की निदान आजतरी त्यांच्या हस्ते कवटीबॉल स्पर्धेचे उद्घाटन होईल. ( बज्या स्टेजवरून निघतो.) बजरंगराव आता शरीराने जरी कवटीबॉल सोबत गेले असले तरी मनाने मात्र आपल्या सोबतच असतील. तर एकदा ढोलताशे आनी टाळयांच्या गजरात आपन बजरंगरावांची रवानगी करूया.

(बुलेट स्टार्ट होऊन गेल्याचा आवाज येतो. **काळोख..**)

(**प्रकाश..** कला केंद्र.. शालू.. इंदू.. यांच्या नजरेखाली मैनाला नृत्याचे धडे देणे सुरु होते. सोनाबाई या सगळयावर लक्ष ठेवून आहे. पोपट डोळे फाडून मैनाला पाहत आहे. सोनाबाईने काय म्हणून खुणावल्यावर तो काही नाही असं मानेने म्हणत मान खाली घालत आहे. गोपीनाथ रामभाऊ सोबत कला केंद्रामध्ये येतो. रामभाऊ आश्चर्याने तिथे चालणारा सारा प्रकार पाहू लागतो. सजून सर्व मुली थियेटरमध्ये जात

आहेत. थियेटरमधून इंदू, शालू, मैना डान्स करून बाहेर येतात. तिथे रामभाऊची मैना सोबत नजरानजर होते. ते इंदूच्या नजरेतून सुटत नाही.)

गोपीनाथ: (गोपीनाथ शालूच्या हातात नोटांचं बंडल ठेवतो) दहा हजाराची स्पेशल बैठक लाव. आज मोठे पावने आले आहेत. आपले खास दोस्त आहेत. काय समजलं का? ( इंदूला खुणावतो.) शाले, रामभाऊला बैठकीला बसव मी आलोच. ये हनम्या आज जरा चोपून उडू दे बार.

हनम्या: तुमी आदेश करा फक्त मालक. कोंबडं काय आपन बकरं पन कापू.

गोपीनाथ: कोंबडं झनझनीत झालं पाहिजे. आनी काय गळा वला बीला करनार का न्हाई आमचा? जरा बाटल्या पाठवा. रामभाऊ तुमी बसा मी आलोच. ( गोपीनाथ इंदू जवळ जात.)

गोपीनाथ: ( इंदूला ) खूप मोठा आसामी आहे. खेच आज जितकं खेचता येतील.

इंदू: शाले.. माझ्या पाकीटातलं पंचवीस हजार दे गोपीशेट ना. गोपीशेट.. हिशेब राहील पंचवीस हजाराचा.. ( गोपी पैसे

घेत हसत जातो.) मैने.. आज तुझी मोठी परीक्षा.. जे शिकलीस ते उतरवायचं आज. आजच बोर्डाची परीक्षा हाय आसं समजून पेपर द्यायचा. तुझं नाणं शंभर नंबरी हाय पन ते आज वाजवलंस तरंच कळंल सगळयांना.

(एक झकास लावणी सुरु होते. गाण्यासोबत मैना रामभाऊला पटवित नाचू लागते. गोपीनाथ आपल्याकडील बंडल पोरींवर उधळतो आहे. त्याचा हिशेब ही तितली माणसं बारकाईने ठेवीत असतात. गोपीनाथला पैसे उधळताना पाहून रामभाऊ देखील अधिक जोशाने पैसे उधळू लागतो. मैनाच्या नृत्य आणि अदानी घायाळ झालेला रामभाऊ मैनाला वेड्यासारखा पाहत असतो. बैठक संपते.)

गोपीनाथ: काय रामभाऊ , कसं काय वाटलं ? म्हंजे नाच बीच आवडला कि नाही?

रामभाऊ: हो म्हणजे काय. खूप सुंदर नाचतात सगळे.

गोपीनाथ : सगळे कि स्पेशल कुनीतरी...? रामभाऊ, आमी पाहिला ना राव तुमचा घोटाळा डोळयाच्या कोनातून.

रामभाऊ : छे छे.. असं काही नाही.

गोपीनाथ: बरं राहिलं. नका सांगू आमाला. चला बाबा सगळयांनी बाहेर. संपली बैठक.

रामभाऊ : असू देत थोडा वेळ.

गोपीनाथ : आसं होय. पन मग सगळयांची गर्दी कशाला. इंदू बस इकडं. ये मैने.. तू पन बस जरा.. बाकी बाहेर गेलात तरी चालंल. ये शालू, तू कुठं चालली. तू बस कि इथं माझ्याजवळ. (तिला स्वतः जवळ बसवितो.) बरं, रामभाऊ आता बोला जे काय बोलायचं.

रामभाऊ : छे मला कुठे काय.

गोपीनाथ :नाच नाय आवडला का मैनेचा ?

रामभाऊ : छे छे.. असं कुठे म्हणालो मी. फार सुंदर नाच करतात त्या.

इंदू : माझी धाकली भन हाय ही. अलीकडंच आली इथं. म्हंजे आता शिक्षन संपलं. आज पहिलाच नाच हिचा इथं. तो पन तुमच्यासारखा चांगला घरंदाज कलेचा दर्दी मानूस येनार म्हनून. ये मैने, ये इथं बस.. अगं परके का हायेत ते. बस.. चांगला मानूस लगेच ओळखायचा समोरूनच. काय दुनियादारीची सवय नाय ना तिला. फक्त घर आनी शाळा.

रामभाऊ : अरे वा.. किती शिकलेय.

मैना : आता दहावीलाच व्हते. पन आता सोडनार शाळा.

रामभाऊ : का ?

इंदू : जेवढं तेव्हढं शिकली. आता काय करनार शिकून. आमच्यासारख्याना कोन नोकर्या देनार. आपलं पोटा पान्यासाठी हे सगळं करावं लागतं. कला जोपासायची म्हंजे तडजोड करावीच लागते ना. तुमाला कसा वाटला हिचा नाच ?

रामभाऊ : खूपच छान. नृत्य बिजली आहे ही. पण हिला असं इकडे नका लोकांसमोर...

इंदू : काय करनार साहेब. पोटासाठी करावं लागतं नायतर मला जमल का हो. नुकती कुठं वयात येवू पाहतेय ती. आजून कुठल्या परपुरुषाचा स्पर्श पन नाय झालाय तिला. तुमची इच्छा आसंल तर नाय नाचनार ती कोनासमोर.. फक्त तुमच्यासमोरच काय ते.

रामभाऊ : म्हणजे..?

शालू : म्हंजे चिरा लावा तुमी तिच्यासोबत.

रामभाऊ : चिरा ?

शालू : म्हंजे लग्न करून तिची काळजी घ्या हो. ( रामभाऊ गोंधळतो.) अवो म्हंजे लग्न करून घरी नाय न्यायचं. इतकं कुठं नशीब आमच्यासारख्याचं. बरं का? बस तुमी चिरा लावून तिचा खर्च बघायचा. तिला काय हवं नको ते बघायचं. आजून काय नाय. तुमच्यासारखा भला मानूस तिच्या नशिबी आला तर पोरगी नशीब काढील. नायतर काय माहित दुसरा कोन आनी कसा येईल.

इंदू : खरं सांगू का दाजी. अगंबाई... माझ्या पन तोंडून काय आलं बघा. माफी मागते हा. काय करू.. लाडकी भन हाय ना माझी. एकुलती एक. पन खरंच.. तुमी तिच्या डोक्यावर हात ठेवलात तर खूप भलं व्हईल तिचं. ( रामभाऊ गोपीनाथकडे पाहतो.)

गोपीनाथ: रामभाऊ, पहिल्याच नजरेत घायाळ झालास दोस्ता.. कशाला मन मारतोस. तिच्याकडं बघ.. ती पन भारावलेय तुझ्या चांगुलपनावर. नायतर उद्या कोन कुठला बेवडा येवून तिच्या सौंदर्याची , निरागसपनाची वाट लावील. लेका हात पुढं कर .

रामभाऊ : अरे पण माझं लग्न झालंय.

गोपीनाथ: ते समाजासाठी. हे फक्त तुझ्यासाठी आसंल. समाजासाठी जगताना.. कुटुंबासाठी जगताना आपन स्वतालाच विसरतो दोस्ता. बघ तिच्याकडं. नाही मन करीत का तुझं.. मैना ये इकडं. हात पुढं कर. रामभाऊ तुझा हात दे. ( दोघांचा हात हातात मिळवतो. रामभाऊ आवंढा गिळतो.) आता बोल चिरा लावनार कि नाही. बोल ना...

रामभाऊ : हो लावतो.

गोपीनाथ: चला पेढं वाटा. आता मैना फक्त रामभाऊची बरं का. उद्या परवामध्ये बसू बोलनी करायला..

रामभाऊ : बोलणी..?

गोपीनाथ: रीत हाय बाबा इकडची. मी हाय ना. आता सगळं माझ्यावर सोडायचं. चला सगळयांनी.. आनी पुढल्या तयारीला लागा.

(गोपीनाथ इंदूकडे पाहत स्माईल देतो. मैना आणि रामभाऊ दोघे चोरून एकमेकांना पाहत असतात. **काळोख.**)

( **प्रकाश...** इंदू बंगला.. नानी समोर सगळे बसले आहेत. रामभाऊ आणि गोपीशेठ येतात. नानी सरपंचासोबत त्यांची ओळख करुन देते. )

नानी : हे गोपीनाथ शेट आनी हे रामभाऊ. म्हंजे मैनेचा चिरा यांच्यासोबत लागनार आहे. हे आमच्या गावचे सरपंच बरं का. ( रामभाऊ , सरपंच, गोपीनाथ सगळे एकमेकांना नमस्कार करतात. ) कुनीतरी ते चहापानी आना की लवकर. किती येळ झाला?

सरपंच : तुमी बोलून घ्या पाव्हन्यांसोबत. मी बघतो चहाचं.

( एकजण चहा घेवून येतो. सरपंच त्याच्या हातातून चहाचा ट्रे घेतात आणि सगळ्यांना चहा देऊ लागतात. )

रामभाऊ : सरपंच साहेब तुम्ही बसा ना. तुम्ही कशाला उगाच?

सरपंच : त्यात काय ओ. आपलंच घर हाय. नानी दुरून मावशी लागते आमची. मग नातंच हाय ना आमचं या घराशी पूर्वापार. म्हंजे आमच्या आजोबांनी ठेवली होती नानीच्या मावशीला. आता आपल्याच घरात काम करायची कसली लाज. थांबा एवढा ट्रे ठेवून येतो. ( चहा देवून आत ट्रे ठेवायला जातो.)

गोपीनाथ: ह्याला म्हनतात रुबाब. बघा सरपंच कसा नोकरासारखा कामं करतो इथं. ( नानी हे ऐकून खुश होते.)

नानी : ( मुद्दाम ) सरपंच येताना जरा पान सुपारीचं पन घेवून या बरं का. (रामभाऊकडे पाहत हसून) आपल्या नात्यात हाय. त्याला अक्खा उभा केला ना आता इलेक्शनात. आमीच ओतिला ना पैसा. बरं का.. आता जरा आपन आपलं.. चिरयाची बोलनी करू. आपला रिवाज हाय तर पाळायलाच पायजे ना. बाकी काय जास्त नसतं हो पन मानपान, खर्च आनी समदं बघावं लागतं.

गोपीनाथ: मी काय म्हनतो नानी, रामभाऊ काय साधासुदा मानूस नाय. खर्चाला काय बी कमी पडनार नाय.

नानी : आता चिरा लावायचा म्हंजे लग्नासारखं मानपान असनारच. आता काय महागाई लागून राह्यली ना. पंचवीस लाखाचा अंदाज व्हता पन इंदू लय चांगलं बोलून राह्यली मालकांबद्दल. तर मग आता पुढं काय बोलनार. आपन पंधरा लाखाला थांबू. बाकी काय चिरा उतरला कि बकरा कापावा लागतो. गाव बोलवावा लागतो. तर जो काय व्हईल तो खर्च समोर होवू दे. आपलं बाकी तसं काय नाय हो.

गोपीनाथ: नानी. दोन काय चार बकरं कापा की.  रामभाऊ हाये ते. मी दिला शब्द. चला तयारीला लागा.

(रामभाऊ होकारार्थी मान डोलावतो. सरपंच पानसुपारीचा ट्रे आणतो. सगळे पानसुपारी घेवू लागतात. **काळोख...** )

(**प्रकाश..** पाणवठा.. पाणवठ्यावर बायका पाणी भरीत,कपडे धुवत आहेत. शेजारची मुलगी देखील तिथे कपडे धुवत आहे. नानी तिथे येते.)

नानी : झालं का बायानो पानी भरून?

बाई १: व्हय नानी. चाललंय.

नानी : मी काय  म्हन्ते. आमच्या मैनेचा चिरा लागला ना तर उंद्याच्याला वाड्यावर जेवनाचा कार्यक्रम ठेवला हाये तर समद्याजनी उद्या यायचं बरं का. समद्यांची साडीचोळीनं वटी भरनार हाय मी. आता घरातला शेवटचा चिरा म्हनल्यावर समद्यांचे आशीर्वाद नकोत काय? समद्यांनी टायमावर या बरं का. इसरू नका. मग येवू का आता?

बाई 1 : व्हय नानी. येतील समद्याजनी (नानी जाते.) आजपासून अजून एक नवी रांड तयार झाली गं. ( सगळ्या हसतात.)

बाई 2 : साडीचोळी मिळतेय ना आपल्याला. मग मरू दे ना गं... रांडा सजत राहू देत ना. आपल्याला काय?

बाई 3 : पोटच्या पोरींना रांडा बनवून ऐश करू लागले बाबा हे लोक.

बाई 4 : त्यांना का बोलून राह्यलो गं आपन. त्यांच्या तर पैशाच्या जीवावर सगळे कार्यक्रम करतो ना आपन गावाचे. त्यांच्या पैशावर देव उठीतो आपला. देव कधी उठनार.. ते सरपंच कोन बसनार सगळं याच रांडा ठरवतात ना..? मग पुढं काय बोलायचं आपन. फरक एव्हढाच कि असली रंडीबाजी आपल्या पोरींबाळीना करायला लावून आपन असा तोरा मिरवीत नाय हेच आपलं नशीब. चला आता इथं ढुंगान टेकवून काय पोटातली आग थांबनार नाय. बकरा उद्या कापनार हैत, आज आपल्याच घरी भांडी घासावी लागनार. आता पासून उपाशी राहून जमल का? काय गं शांते ?

(सगळया हसत विंगेच्या दिशेने निघतात. मागून मुलगी देखील निघते.)

( विंगेच्या दुसरया बाजूने एका झाडाखाली भिमा, सागरया, किसन येऊन बसतात. इतक्यात बुलेट थांबल्याचा आवाज येतो. सगळे त्या दिशेला पाहतात. बज्या हातातलं ब्रेसलेट, चैन सरळ करत येतो.)

भीमा: ढेन्‍या बाबा आला बघ.

सागरया: आयला बज्याशेट. कुठं गेलाता ? आज एकदम छावाच जनू.

बज्या: काय नाय बा आसंच. आपली तर स्टाईल हाय ही. खाऊन पिवून मस्त राहायचं काय?

किसन : आता तुमी नशीब काढलं बज्याशेट. ढुंगनाखाली गाडी, हाता गळयात सोनसाखळया. तुमचा रुबाबच येगळा.

सागरया : मग काय पार्टी बिर्टी देनार कि नाय आपल्याला बज्या शेट.

भीमा: ह्याच्या आयला... ये सागरया - हाग्र्या.. कुनाशी बोलतोस तू ? पार्टी देनार का म्हंजे ? आरं बज्याशेट कधी नाय बोलले काय आपल्याला. तू फकस्त बोल पार्टी हवी.. बोल.. बोल ना रे हाग्र्या.

बज्या : ( हसत.. गळयातली चैन.. हातातलं ब्रेसलेट नीट करीत ) दिली. पार्टी दिली. नुसती दारू नाय... चिकान , मटान जे जे पायजे ते देवू. या ऐतवाराला बसुया ना माळावर.

सागरया : आई शपथ , चालतंय की..

बज्या : आनी हो उद्या कार्यक्रम ठेवलाय बंगल्यावर. तवा यायचं सगळयांनी.

किसन : कसला कार्यक्रम?

बज्या: ते चिरा लागला ना मैनेचा तर दाजी येनार आहेत.

सागरया : आरे पन त्या दिशी तर दाजी येवून गेले ना?

बज्या: ते येगळे दाजी. हे येगळे.

भीमा: ये शेंग्दान्या. तुला नाय कळनार. इकडं येग येगळच असतात दाजी.. तू उपटत बसं.. मुळयाची भाजी. बरं का बज्या.. येतो आमी. आनी ब्रेसलेट जाम चमकतय. नवीन केलं का? सुमडी मे कोमडी .

बज्या: ते दाजींनी दिलंय पारगावच्या.

किसन : आनी चैन ?

बज्या: ती पुळूजच्या दाजींनी बनवली.

सागरया : बरंय बाबा. मज्जा हाय तुझी. ब्रेसलेट, चैन आनी बोटात धा धा आंगठ्या. मोठी लिस्ट हाय बाबा दाजींची .

भीमा: तू गप रे. ह्याच्या आयचा किडा वळवळतोय मधे मधे.. एकदा का सुरु झाला कि झाला. बरं का बज्याशेट.. मी काय म्हनतो. ते माळावरच्या पार्टीचं पक्कं ना? म्हंजे एकदा कन्फर्म करून घेतलं हो आपलं?

बज्या : आता झालं का. आपन एकदा बोललो पार्टी देनार तर देनार. (चैन,आंगठ्या व ब्रेसलेट नीट करीत.) चला येतो मी. (बज्या जातो.बुलेट निघून गेल्याचा आवाज येतो.)

भीमा: ह्याच्या आयची शिट्टी वाजवली.. बज्या शेट.. ये रिंगनात .. घालतो ढुंगनात

सारे : पैसेवाला बज्या शेट .. दाजीच्या जीवावर आंगठ्या आनी ब्रेसलेट.. दारू आनी मटान घे आनी आमाले माळावर रातच्याला भेट. ( सगळे हसतात. **काळोख..**)

(**प्रकाश...** इंदू बंगला.. सर्व मुली बसून गप्पा मारीत असतात. मैना शांत बसलेली असते. )

नंदा : काय गं अशी हारवल्यासारखी का हायेस तू? चिरा उतरनार तर घाबरलीस की काय?

मंदा : चूप गं म्हशे . तुझं आपलं कायपन. ये मैने काय झालं गं ?

मैना : लय तरास व्हतो का गं चिरा उतरताना ?

नंदा: लय गम्मत वाटते. चिचा खाताना टाळू सोलून निघतो पन चिचा तोंडातून टाकावीशी वाटते काय? नाय ना..? आजून जास्त जास्त खावीशी वाटते ना..? (डोळा मारीत) अगदी तसंच वाटतं. सगळं काय आजून आजून करावं वाटतं.

मंदा : हिनं तर चिरयाच्या रातीला धुडगूसच घातला व्हता आनी दुसर्या दिवशी आमाला सगळी योगासनं सांगीत व्हती. बुडकीला लाज शरम पन वाटली नाय आनी आता काय पलंगतोड तयार झाली. तू घाई नको करू. जे करायचं ते त्यांनाच करू दे. तू जितकं सुख मिळवता येईल तितकं मिळव. आपल्या आयुष्यातली हि पहिली रातच आपल्याला स्वर्गसुख देते. लग्नाची पहिली रात असल्यासारखी. नंतर काय रांड म्हणूनच बघतात गं आपल्याकडं. पहिल्या राती प्रेम करनारा मालक नंतर आपल्याला पायतान फाटेपर्यंत घासून वापरतात ना तसाच वापरून काढतो. अगदी मन भरेपर्यंत आनी मग कोनत्याही कुत्र्यासमोर हड्डी टाकावी तसं आपल्याला टाकलं जातं.

(मंदाचे डोळे भरतात. इंदू येते. )

इंदू : ये पोरींनो, खेळत काय बसलात. जा तयार व्हा पटापट.

(मुली निघून जातात. इंदू मैना जवळ येऊन बसते आणि तिचे केस विंचरु लागते. मैनाच्या हातातल्या आरशात इंदू मैनाचा चेहरा पाहते.)

इंदू : चेहरा का उतरलाय तुझा? आपन ज्या खानदानीत जन्म घेतलाय तिथल्या रितीभाती आपल्याला पाळल्याच पायजेत. तुला शाळा सोडायला लावली कारन तू वयात आलीस. देवानं खूप सुंदर शरीर दिलंय तुला. याच शरीराच्या जीवावर आता तुला पुढचं आयुष्य आरामात घालवायचंय. लक्षात ठेव. आपलं कुनी नसतं. आपलं शरीर सुंदर तोपर्यंत आपली चलती. नंतर सगळं संपनार. खरं प्रेम बीम काय नसतं. त्यानं पोट भरत नाय कधी. त्यासाठी पैसा लागतो. ज्याच्याकडं पैसा त्याची चलती. मी जेवढं तेवढं कमावून ठेवलं म्हनून तुमाला लोकं सलाम ठोकितात. नायतर ओरबाडून खाल्लं आसतं आख्ख्या गावानं. हे जंगल हाय मानूस नावाच्या घानेरड्या प्रान्याचं. इथं आपनच सरस राहायचं नेहमी. नायतर आपला टिकाव लागनार न्हाई. 'चिरा' म्हंजे तडजोडीचं लग्न. लग्न झाल्यावर बायको नवर्याकडून पायजे तसं दागिनं , पैसा , घर सगळं घेते ना?

आपन पन तेच करायचं . पन एक लक्षात ठेवायचं . ती लग्नाची बायको जे काय घेयाला पन्नास वर्ष घालवते, ते आपल्याकडं पन्नास दिवसात आलं पायजे, असा नादाला लावायचा त्याला.

(मैना आरश्यातून इंदूकडे पाहते. हळूहळू पडदा पडतो.)

# INTERVAL

# अंक दुसरा

( **प्रकाश..** इंदू बंगला.. सगळ्या मुली रामभाऊच्या  शेजारी त्याच्या सोबत मस्ती करीत बसल्या आहेत.)

नंदा: बरं झालं बाई बाकी पोरीना गोपीशेठ सोबत केंद्रात पाठवलंत. आता इथं कसं निवांत बसायला मिळालं  ना. बरं का दाजी, एक इचारू का? न्हाई म्हंजे..  तुमी किती जोरात चालवता बाई गाडी रस्त्यातून. लईच फास्ट दिसताय तुमी दाजी. काल रातीला पलंगतोड पन लई फास्ट केला का?

मंदा: या बुड्कीच्या जिभेला काय हाडच नाय.  तुमी नका लक्ष देवू हिच्याकडं. तुमी दमानं बसा.

नंदा: आता गं.. बसलेच हायत कि ते. मी कुठं फुगड्या खेळतेय त्यांच्या सोबत.  काय गं शालू अक्का... ये,  तू का गं गप्प अशी? तुला तुझा चिरा आठवला कि काय ? ( सगळ्या हसतात.)

शालू : हिचा गळा दाब गं. किती बोलून राहिली बघ. मनावर घेऊ नका हिचं काय बरं का?

नंदा: आता मी माझ्या दाजी संगत मस्ती नाय करनार तर कोना संगत करू? साली आधी घरवाली होती है ना. मग अर्धा हक्क माझाबी लागतोच की. काय हो दाजी, चालंल ना मी तुम्हास्नी? (डोळा मारते. सगळ्या हसतात. रामभाऊ बावरतो. मैना येते.)

शालू : आली बघा तुमची सुंदरा... चल गं नंदे आता बसू दे दोघाना जरा. ( सगळ्या जणी हसत जातात. रामभाऊ मैना ला जवळ बसवितो. )

रामभाऊ : किती सुंदर दिसते आहेस ?

मैना : आता सारखं तुमीच टक लावून बघता आनी नजर लावता बाकी मला. ( ती हातानी स्वतचा चेहरा झाकून घेते. तो तिचे हात बाजूला करीत असतो.)

मैना : आता गं बया.. नका की आसं करू. तुमी एकदा का सुरु झाला कि मग थांबतच नाही.

रामभाऊ : आता. तू देतेस का थांबायला? काय.. थांबू का?

मैना : ( मानेने नाही म्हणत) नका थांबू. मस्त वाटतं मला. चिचा खाताना वाटतं तसंच मस्त वाटतं जवा तुमी... (ती ओठ दातात घेवून चावते. रामभाऊ तिला जवळ ओढतो.)

मैना : ऐका ना... सगळया पोरी चर्चा करून राह्यल्यात.

रामभाऊ : कसल्या चर्चा ?

मैना : जीजीला माझ्यापेक्षा जास्त दागिने चढवले होते दाजींनी तिच्या चिऱ्याच्या टायमाला.

रामभाऊ: मग त्यात काय. आपण पण जाऊ कि दागिने आणायला. जे जे तुला आवडेल ते घे. मग बघू कोण काय काय बोलतं ते.(ती खुश होऊन त्याला मिठी मारते. **काळोख..**)

( **प्रकाश...** इंदू बंगला.. नानी, आणि इंदू पत्ते खेळत असतात. बज्या येतो.)

बज्या: रात्री उशीर व्हईल नाने. तालुक्याला चाललोय जरा.

नानी : हे आमचं बाजीराव बघा. नुसतं इकडं फिर.. तिकडं फिर. उडवताय पैसं. पोरी इथं घासतायत आनी हे बारगीर उडवीत्यात बाहेर जोरजोरात.

इंदू : बोलली म्हातारी. आता या वयात न्हाई उडवनार तर काय म्हातारबाबा झाल्यावर उडवनार का ? सावकाश जा रे तान्या.. जरा माझा भाव कुठं निघाला की झालं रामायन

सुरू म्हातारीचं. जा रं तू तान्या.. ( बज्या कपाळावर आठ्या घेऊन निघून जातो. मैना बाहेर येते.)

इंदू : म्हातारे काय पन बोलतेस. काय कळतं कि नाय तुला ?

नानी : तर मला काय कळून राहनार. खुळी ना मी. पोरी, जवानी जास्त दिस टिकत नाय आनी जिवाचा काय भरोसा नाय. तुझी माय गेली तवा तू या मैने एवढी व्हतीस... पन तिच्यामागं तू मेहनतीनं इतकं सगळं उभं केलंस. मैने, तू बी जीजेच्या पावलावर पाऊल ठेवून जितका जास्त पैसा अडका, वस्तू , दागिनं, घरदार त्या रामभाऊकडून खेचता येईल तितक्या लवकर खेचून घे. ह्या लोकांचं पिरेम चार दिसाचं असतं. म्हनून याच चार दिसात जितकं यांना लुटता येईल तितकं लुटायचं. गेली येळ आनी गेला पैसा परत मिळत न्हाई. रामभाऊ मोठा पैसेवाला हाय. त्याला असा नादाला लाव की त्याचं समदं तुझं झालं पाहिजे. इंदूनं कसं समदं भरत्याकडून आपल्या नावावर करून घेतलं तसंच तू बी करून घे. एकदा का जवानी गेली कि संपलं सारं.

( मैना तिच्या अनुभवाचे बोल ऐकत असते. दरवाज्याची बेल वाजते. इंदू दरवाजा उघडते. रामभाऊ आत येतो आणि बसतो. )

मैना : झालं का ? माझा वाढदिवस इसरलात ना.. ?

इंदू : अगं बाई मैने, मी पन इसरलेच बघ... ते आपल्या बाजूच्या गावाच्या सरपंचानं तुला वाढदिवसाला गळ्यातली तुशी पाठवली होती. खूप हलकी होती. मी बोलून राहिले कि तिचा चिरा लागला तर तिच्या मालकाला नाय आवडनार. तिच्या गळ्याची काळजी घेतील ते. काय मालक ?

रामभाऊ : हो. घेऊ ना आपण त्यात काय.. ( इंदू गालात हसत मैना ला डोळा मारते.)

इंदू : चल नाने, आपन मळ्यावर जाउन येऊ.. दार लावून घेते मालक. ( म्हणत ती मैना ला डोळा मारुन दरवाजा लावीत गाणं गुणगुणत बाहेर पडते.)

मैना : ऐकलं का? मला कायबी करून ७० लाख पायजेत. मला जीजीपेक्षा मोठा बंगला बांधायचाय. तिच्या त्या भरत्या शेठला दाखवून द्यायचंय कि माझा मालक त्याच्यापेक्षा मोठा मानूस हाय. तवा काय पन करा पन सत्तर लाखाचा बंदोबस्त करा.

रामभाऊ : अगं, सत्तर लाख खूप मोठी रक्कम आहे. असं घेवून या म्हंटलं आणि आणली असं नाही होत. आणि खरं सांगायचं तर आता

माझ्याकडे इतके पैसे पण नाहीत. खूप लॉस सुरु झालाय बिजिनेसमध्ये.

मैना : एक घरच मागितलं ना आनी ते काय माझ्या एकटीसाठी मागितलं का ? दाजी जीजीची परतेक गोस्ट कशी फुलावानी झेलतात .. त्याला म्हनतात प्रेम.. नायतर तुमी.. पैसे नाय तर मग मला तोंडपन दाखवू नका मग. मला गरज लागली आनी मालक ती भागवत नसल मग तो कसला मालक. ( म्हणत ती रागावून बाहेर निघून जाते. रामभाऊ कपाळावर आठ्या आणून छगनभाईला फोन करतो. )

रामभाऊ: रामभाऊ बोलतोय. हा छगनभाई थोडं काम होतं. ते मागच्या वेळेस तुम्ही बोलले होते ना. हा. माझी गाडी. बस कमीत कमी पन्नास लाख मला हातात हवे आहेत. तुम्हाला तर माहित आहे माझ्या गाडीची किंमत. अगदी नवीन गाडी आहे. हो.. हो पन्नास तर हवेत. गरज म्हणजे.. चार चार गाड्या ठेवून काय करू ना. पडून खराब होतात मग. हो व्यवहार डन. मी स्वताच येतो ना पैसे न्यायला .

(मोबाईल ठेवतो आणि निघतो. **काळोख...** )

( **प्रकाश..** कला केंद्र.. रात्रीची वेळ. सगळया मुलींची बैठका संपवून धावपळ सुरू आहे. कुणी आंघोळीहून येतेय. कुणी कपडे वाळत घालतेय. कुणी संडासामध्ये आहे. कुणी बाहेरून दरवाजा ठोकतेय. )

मुलगी 1 : आटप की गं लवकर. काय महिन्याभराचं आजच बाहेर काढतेस की काय.

मुलगी 2 : व्हय, तू मोजाया येतेस काय आत.

मुलगी 1 : रंडके ये की लवकर बाहेर. जोरात लागलेय कळ.

मुलगी 2 : मग इतका येळ दाबून धरायला मी सांगितलं होतं का तुला?

मुलगी 1 : तू बाहेर तर ये तुला कशी दनकते ते बघच.

मुलगी 2 : धुवायला तर देशील की नाही..?

मुलगी 1 : लवकर धू ना. आता धुवून राहिलीस की धागे मोजीत हायेस. आक्ख्खा धबधबा नाय नेलायस ना धुवायला. ( आतली मुलगी बाहेर येते.)

मुलगी 2 : जा मर. काय तुझी सोन्याची हाय ती घेऊन बस आनी पाडीत बस दागिनं.

मुलगी 1 : आता तुला ना. ( तिला पुन्हा कळ मारते.)

मुलगी 2 : आवाज नको चढवू. नायतर रावनाची सोन्याची लंका सगळयांना इथंच पाहायला मिळायची.

(हसते आणि निघते. पहिली मुलगी घाईघाईत संडासात जाते. शालूच्या मागोमाग पोपट आत येतो.)

पोपट : शालू... माझे शालू... आज जाम मूड होवून राहिला गं.

शालू : आता. मूड झाला तर मी काय करू? जा.. गप गुमान जाऊन काम कर. अक्का येईल आता. जर तिनं पाहिलं ना तर मग पोपटचा पोपट आकाशात उडून जाईल भुरकन.

पोपट : ये शाले. आपन पोपटराव हाय. आपन काय कोनाच्या बापाला पन घाबरून नाय राह्यलो.. काय ?

शालू : ( डोक्यावर पदर घेत उभी राहते.) अगंबाई अक्का?

( पोपट घाबरून उठतो. शालू हसते.) म्हने कोनाच्या बापाला पन घाबरून नाय राह्यलो. अक्काचं नाव घेतलं नुसतं तर मुतायचाच बाकी होता. ती बघ अक्काची गाडी आली. जा आता.

पोपट : गाडी आली तर आली. आपन काय ( विंगेच्या दिशेने वळतो. समोर अक्काची गाडी येवून थांबल्याचा आवाज येतो. विंगेतून अक्काचा आवाज येतो.)

सोनाबाई: ये रंडकीच्या. काय करून राहिला रं तू तिथं? कामं आटोपली का सगळी?

पोपट : हा ते अक्का.. मी ते आपलं.. काय ते...

शालू : पोपटराव उठा आनी सुटा. ( पोपट घाई घाईने निघतो. शालू देखील निघते. दुसर्या विंगेतून नंदा आणि ढोलकीवाला एकमेकांना खाणाखुणा करीत लपून छपून भिंती मागे जातात. तिथून जाणार्या अक्काला दोघांचा आवाज येतो आणि ती काळोखातून रस्ता काढीत जाऊ लागते. मागून पोपट चाललेला असतो. ती त्याला आवाज न करण्याबद्दल खुणावते. भिंतीच्या कोनाड्यात जाऊन पाहते आणि मागूनच ढोलकीवाल्याच्या पार्श्वभागावर लाथ मारते.)

सोनाबाई: भाड्या..

नंदा : (घाबरुन ) अक्का... ( नंदा आणि ढोलकीवाला दोघेही घाबरून पळून जातात.)

सोनाबाई : माझ्या हातात ये फुकनीच्या. तुझ्या पायपाची हवाच काढून टाकते. आनी ये रांडे, कुठं पळशील गं.. लय आग हाय काय तुझ्यात, जे येवड्या लोकांकडून नाय थंड व्हत.. फुकट बाबुराव आवडू लागलं काय गं तुला...? नको ते धंदे शिकवू

लागली काय तू इथं बाप्या लोकांना. तुला करिते मी सरळ. पोपट्या. हे.. हे काय चाललंय ? आ ? तिला आन फरफटीत माझ्या खोलीत.. आज जाळ शांत करते बघ तिचा कसा.

पोपट : आता आनतो बघ अक्के तिला. ( निघतो. थांबतो.. वळून प्रश्नार्थक ..) पन होती कोन गं ती? म्हंजे काळोखातून दिसली नाय ना नीट दोघबी.

सोनाबाई : आता मला अक्का बोलली म्हंजे आपल्याच पार्ट्यातली एक होती ना आनी तो बी इथलाच असनार. इतक्या रातीला बाहेरचा कसा कोन आत येईल.

पोपट : मी आता जाऊन बघून येतो सगळया पार्ट्यांच्या पोरीना. एक एकीला चेक करतो. झोपल्या असतील तर उठवून चेक करीन आनी उठल्या असतील तर झोपवून. आनी एकदा का ती सापडली कि ताश्या वाजावितोच बघ आज. ( धावत जातो.)

सोनाबाई: ( वळून त्या कोनाड्यात पाहत ) कायपन जागा शोधली..? ( वर पाहत ) चांदन्यांच्या उजेडात.. ( आवंढा गिळत स्वताशीच ) बरी जागा सापडली. आमाला नाय मिळाला कवा असा चान्स.. आता म्हातारपनी सापडून काय फायदा.

जवा पायजे तवा नाय सापडलं आसलं काय. ( शालू तिथून जात असते. )

शालू : कोन अक्का.. ? काय पडलंय काय अक्के तुझं तिथं ?

सोनाबाई: व्हय. न नाय. काय नाय. माझं काय पडनार इथं ? पाडनारी पळाली. काय नाय तू पळ. ( म्हणत ती तिथून विंगेत निघून जाते. शालू तिच्याकडे प्रश्नार्थक पाहू लागते. **हळू हळू काळोख..**)

( **प्रकाश...** सगळे फुल्ल टाईट झालेले आहेत.)

बज्या : कायपन पायजे ते मागवायचं. आपुन हाय  ना. हाय की नाय आपुन.. आपुन कधी नाय बोललोय काय कोनाला. फकस्त आवाज करायचा. आपुन हजर.

भीमा : अंगानं... उगाच नाय बज्याशेठला साहेब.. रावसाहेब.. बाजीराव.. बजरंगराव..  तान्या.. शेट..अं .. अशी भारी नावं हायेत.

बज्या : हायेत म्हंजे.. हायेतच. आपन काय कमी हाय काय?

किसन : आपलं बज्याशेठ त्या आपल्या ग्रामपंचायत अध्यक्ष सच्च्या दादापेक्षा पन कमी नायत.

बज्या : ते लंगडं. ते कसलं शेटाचं दादा. मुतायला जातं तर हात धुतं काय इचार की तुझ्या सच्च्या दादाला. त्याला ग्राम पंचायतला उभा कोनी केला...?

सगळे : कोनी ?

बज्या : मी. त्याला इलेक्शनला पैसा कोनी दिला?

सगळे : कोनी ?

बज्या : मी. त्याला इलेक्शनमध्ये निवडून कोनी आनला ?

सगळे : कोनी ?

बज्या : मी. मग कसला रं तो दादा. तुझे समदे मंत्री संत्री आमच्या बंगल्यावर पडलेले असतात.. ढुंगान वर करून. मला सांगतोय दादा. त्याच्या आयचं लंगडं.

साग्र्या : मी काय बोलून राहिलो बज्याशेट. आपन या आमदारकीच्या इलेक्शनला तुमालाच उभा केला तर?

बज्या : ( हसतो.) तुमी निवडून दिलेले आसे बरेच रंडीबाज खाऊन टाकलेलं चाटायला येतात आमच्याकडं. काय करता रं तुमी..? आमचीच पिऊन मागून आमालाच नावं ठेविता की आमी रांडबाजार चालवतो.. आमचे येगळे येगळे दाजी... आनी तुमी कोन ? दल्लेगिरी करनारे भडवे की आमच्या दारात बांधलेली कुत्री. तुमच्या इलेक्शनला आमी पैसा फेकितो. गावातला परतेक सन आमच्याच पैशानी साजरा होतो. गावात चार बोरिंगी मारून दिल्या ना तवा ते पानी पिऊन मुतायला जाता तुमी.. आनी मुतताना ढुंगनावर हात फिरवीत आमाला बोलता आमी रंन्डीबाजी करतो. रंन्डीबाजी करायला तुमी येता आमच्या दारात कुत्र्यासारखी लाळ टाकत.. मला सांगतोय दादा..... ( सगळे पिऊन पडलेले असतात. बज्या लाथ मारतो त्यांना..) जा करा तुमचा समाज सभ्य.. हाकलून द्या आमाला.. आनी मरा मग तुमच्या आयला उपाशी. आख्खा गाव पोसतो आमी. दारू पिताना आनी मटान झोडताना भोकात जाते काय तुमची सभ्यता? मला सांगतोय दादा... मला सांगतोय.. (

बज्या धडपडत विंगेच्या दिशेने जाऊ लागतो. रातकिड्यांची किर् किर सुरु होते. **काळोख.**)

( **प्रकाश...** कला केंद्र.. मैना रुममधून बाहेर येऊन आरश्यात पाहत तयार होत गाणं गुणगुणत आहे. मागून इंदू येऊन तिच्यामागे उभी राहते.)

इंदू : मैने, पुन्हा फोन आला होता का रामभाऊचा...? एक लक्षात ठेव. एकदा का मालकाला कैची मारली की मारली. बाजारात एका वस्तूची किंमत संपली कि दूसरी वस्तू घेयाची असते. एक गेला की दुसरा नादाला लावायचा. नवीन मालक पहिल्या मालकापेक्षा सरस असला पायजे. इथं नंदा मंदा सारखं सडत नाय राहायचंय तुला. डोळं आनी कान दोनीबी उघडं ठेव. तुझ्यावर सोनाक्का फिदा हाय. तिच्या नजरेत अशीच वर राहा. दिसला बडा मासा की गळाला लागलाच पायजे हे लक्षात असू दे.

( सोनाबाई आणि मॅनेजर  पोपट येतात.)

सोनाबाई: खूप पैसा ओतलाय हे थियेटर चालवायला घेन्यासाठी.

खालपासून वरपर्यंत पेरलाय नुसता. कोन काय करू राह्यल्या मला नाय माहित. पन जो काय बाजार मांडायचा मांडा. इथं नोट बंद तर ती पार्टी पन या थियेटर मधून बंद. जास्त काय बोलून नाय राह्यले.. समजून घ्या पोपटराव.. परत न्हाई बोलनार.

पोपट : जी अक्का. जिचा हिशेब कच्चा . तिचा मी मारनार... ( सोनाबाई त्याच्याकडे पाहते. तो जीभ चावून गप्प बसतो. इतक्यात गणू धावत येतो.)

गणू : अक्का, अक्का.. पोलिस येवून राहिले गाडी घेवून. कायबी ऐकूनच नाय राहिले. आता थियेटरचा दरवाचा तोडून आत येतील. ( सोनाबाईच्या डोळयात राग दिसत आहे. मुली धावत येतात. मागोमाग इन्स्पे आत येतो. मैना घाबरुन इंदूचा हात पकडते.)

इन्स्पे : कलाकेंद्राच्या नावाखाली आख्खा बाजार मांडलाय बाई..?

किती कवळया कवळया पोरी लावल्या आहेत कामाला. मी पी आय.. सज्जन वाघमारे. कालच ड्युटी जॉईन केली. आल्या आल्या पहिला फेरफटका मारला ना आपल्या

एरियात. तर इथं  आपल्याच एरियात कलेची घोंगडी पांघरून बसलेला डान्स बार पाहिला  तुझा.

पोपट : ते काय साहेब पोटा पाण्यासाठी.

इन्स्पे : ये भडव्या, खाली दात खूप आले का रे  तुझ्या. असा बांबू टाकेन ना मागून की, पादलास तरी ढेकर बाहेर येईल तोंडातून. ( सगळया मुलींवर नजर मारीत एक राऊंड मारतो.) सगळा कचकचीत माल भरून ठेवलाय गं. आणि पोटा पाण्यासाठी करता तर काय पोट पाणी फक्त तुम्हालाच आहे होय. आम्ही पण वरुनच खातो आणि खालूनंच काढतो की. दोघांच्यामध्ये आमचं बी पोट आहे ना. आपण खूप कडक आहे. आपल्याशी तेढ्यात नाही राहायचं. मी काय बोलतो सोनाबाई, आता आपण आलोय ना तुमची  काळजी घ्यायला. दोन लाख आणायला सांग पटकन. आपल्याला एक गोष्ट दहा वेळा बोलायला नाय आवडत.

( सोनाबाई पोपटला इशारा करते. पोपट बाहेर जातो. आणि कागदाच्या पुडक्यातून दोन हजाराच्या नोटाचं बंडलं आणतो.)

इन्स्पे : ( पैसे त्याच्या हातून घेत.) धंदा बहरलाय जणू... बरं आहे. असाच फुलू दे धंदा.. ( दोन मुलींवर नजर मारीत) या दोघीनां रात्री पाठवून दे चौकीवर. आम्हाला पण कळू देत काय ट्रेनिंग मिळाली पोरींना.

( हसत निघून जातो. सोनाबाई ब्लाऊजमधून छोटासा मोबाईल काढून फोन करते व फोनवर बोलू लागते. लाऊड बॅकग्राऊंड म्युझिक.. सगळे स्तब्ध उभे आहेत. सोनाबाई पोपटकडे पाहते. पोपट पुढे येऊन पानाचा डबा उघडतो. सोनाबाई डब्यातलं पान उचलून तोंडात ठेवून चावते आणि बोटं केसातून फिरविते. इन्स्पे दरवाजातून आत येतो. तेच कागदाच्या पुडक्यातून नेलेले दोन लाख सोनाबाईच्या पायाजवळ ठेवतो आणि तिच्या पायावर डोकं ठेवतो. सगळे आश्चर्याने त्याच्याकडे आणि तिच्याकडे पाहत असतात. )

इन्स्पे : चूक झाली माझी. मला नव्हतं माहीत. ( हात जोडत ) माझी नोकरी... ( सोनाबाई थुंकायला नजरेने पिकदाणी शोधते. पिकदाणी इन्स्पेक्टरच्या शेजारी असते. तिने त्याच्याकडे पाहून पिकदाणीकडे पाहिल्यावर. तो ती पिकदाणी उचलून तिच्या चेहऱ्याजवळ नेतो. ती पिकदाणीमध्ये थुंकते. थुंकी त्याच्या हातावरची उडते.)

सोनाबाई : ( त्याच्या हातावरची थुंकी स्वतःच्या साडीने पुसत..) जरा सांभाळून इन्स्पेक्टर साहेब.. अंगावर उडालेले डाग पुसता येतात पन काही डाग एकदा का अंगाला चिकटले की मग निघता निघत न्हाईत. ( त्याच्या कानाजवळ तोंड नेत) नाव नुसतं वाघमारे असून काय उपेग. आमच्यासमोर बसताना भले भले वाघ शेपूट ढुंगनातच घालून बसतात.. कुत्र्यावानी. तुझ्या डोक्यावर जितके केस न्हाईत तितके बापे झेपवले हायेत मी. सोनाबाई नाव हाय माझं. मिठाईचं दुकान चालवते मी. तोंड ग्वॉड करायचं आनी निघायचं. जास्त खोलात शिरलं की ढुंगनाला इतकं मुंगळं चावतील ना की ढुंगनाचा पार नगारा व्हईल आनी मग सगळंच येतील बडवायला. आलं का ध्यानात..? पोपटराव.. साहेबाना बाहेरचा रस्ता दाखवा नीट.. पुना चुकून पन या दिशेला चुकले नाय पायजे.

( इन्स्पे उठून तिला पाया पडून निघतो. सगळयाजणी अवाक होऊन पाहत असतात. इन्स्पे त्याच दोन मुलींसमोर जाऊन क्षणभर थांबून त्या दोघींकडे पाहतो. दोघी त्याच्यावर हसतात. घामाघूम झालेला तो घाम पुसत मान खाली घालून निघून जातो. मैना आश्चर्याने इंदूकडे पाहते.

सोनाबाई पुन्हा पिकदाणीमध्ये थुंकते. तिचे डोळे लाल झालेले असतात. ती निघते. तिच्यामागोमाग सगळ्या सोनाबाईच्या रूममधून बाहेर पडतात. मैना आश्चर्याने इंदूसोबत बोलू लागते.)

मैना : अक्का जाम पोचलेली हाय गं जीजे. मला वाटलं आज संपलं सगळं. आता खडी फोडीत बसायचं आयुष्यभर. एका रामभाऊला कामाला लावलं तर मला असं होऊन गेलं की मी जिंकलं सारं.

इंदू : आता रामभाऊला इसरायचं.. तो खाली झाला. पन तुझ्यासाठी आजून दिल्ली लय दूर हाय. आता तू थांबायचं नाय. एकदा का वय वाढलं की कुत्रा पन नाय वळून बघनार. आता तुला लांब उडी घेयाची येळ आली हाय. आता मौका हातात आला की लगे उचलायचा. पाह्यलस ना पैसाचं मोठा देव हाये. पैसा हाय तर वळख हाय.. रुबाब हाय. आनी पैसा हवा आसंल तर आपलं अंग लवचुंबकाचचं आसलं पाह्यजे. जो एकदा चिकटला की सगळं दिल्याशिवाय गेलाच नाय पायजे. ( लालाशेट येतो. ) नवीन बकरा आला बघ. जा तयार होऊन ये. ( मैना लालाशेठ कडे पाहत नखरयात

निघून जाते. लाला तिला पाहत ओठावरुन जीभ फिरवू लागतो. ) काय लालाशेठ आज इतक्या महिन्यानी..?

लालाशेठ: मुम्बैला होतो कामासाठी.. जसा आलो तसा आलो तुझ्या मैनेला भेटायला.

इंदू : मग मैनेसाठी लावू का दहा हजाराची बैठक..?

लालाशेठ: लाव की... आज न्हाऊ घालतो तिला पैशात. ( इतक्यात रामभाऊ येतो. इंदू त्याला थांबविते.)

इंदू : लालाशेठची आज दहा हजाराची बैठक लागतेय. नाय म्हंजे, मी तेच बोलत व्हती कि रामभाऊ येनार हायेत तर आधी बघते ते कितीची लावतात बैठक. ( रामभाऊ मान खाली घालतो.)

इंदू : वाईट नका वाटून घेऊ रामभाऊ. ते काय इतक्या पोरी आनी सगळंच सांभाळावं लागतं ना. तुमी बसा कि इथंच आरामात. ये हनम्या, रामभाऊना काय चहा पान्याचं बघ कि सुक्काळीच्या.

( रामभाऊला तो अपमान वाटतो पण तो शांतपणे तिथे बसून राहतो. मैना आतून तयार होऊन येते.)

मैना : ( रामभाऊला पाहून मैना येऊन त्याच्या शेजारी बसते.) मी माझ्यासाठी नाय आमच्या पार्टीसाठी नाचायला चाललेय.. त्यांचं पन पोट हाय ना यावर.. तुमी थांबा. मी आलेच.

( बोलून ती तिथून निघून जाते. रामभाऊ भरल्या डोळयानी ती गेल्या दिशेला पाहू लागतो. )

(बाजूच्या रुम मधे लाला तिच्यावर खोर्याने पैसा उडवीत असतो. ती बेभान होवून नाचत त्याला खुश करीत असते. आणि हे सारं दरवाज्याच्या आडून रामभाऊ पाहत असतो. तो मैनेला बाहेर बोलावत असतो. रागाने मैना बाहेर येऊन त्याच्या कानाखाली मारून त्याचा सगळयांसमोर अपमान करते.)

मैना : निघतो का भाड्या इथून. प्रेमानं सांगून कळत नाय का तुला. खिशात नाय दमडी आनी बघायला आला चमडी.

( तिचं ते रुप पाहून रामभाऊ अवाक होतो. सगळे तो तमाशा पाहत असतात. ती निघून जाते. इंदू देखील हसत निघून जाते. लाऊड बॅकग्राऊंड म्युझिक.. आर्त आलाप. .)

पोपट : पैशाचा खेळ हाय रामभाऊ हा सगळा. (म्हणत पोपट रामभाऊला बाहेर घेवून जातो. रामभाऊचा तो अपमान

पाहताना हणम्या आणि गणू या सोंगाड्याचे डोळे भरून येतात. **काळोख..** )

( **प्रकाश...** बायका नदीवर कपडे धूत आहेत. तिथेच शेजारची गरीब मुलगी शांतपणे पाणी भरत आहे.)

बाई 1 : आपल्या गावात जर कुनी नशीब काढलं आसल ना तर फक्त रांडांनी.

बाई 2 : व्हय तर.. कसल्या बैठका जमवतात आनी कसला बक्कळ पैसा कमावतात.

बाई 3 : नायतर काय आनी आमी धूत बसलोय पोराटोरांच्या ढुंगनाखालची गोनपाटं.

बाई 2 : पंधरा लाख घेऊन बसली चिरा उतरवायचं ती मैना.

बाई 1 : आता गं बया.. आमाला कुनी पंधरा रुपडं पन नसतं दिलं. काय सोन्याचा चिरा बसवलाय की काय रंडकीनं.

बाई 3 : आमच्या नशीबात का नायत गं बैठका ?

बाई 1 : नायतर काय. आसलं सडकं जिनं जगन्यापरीस बैठका लावून रुबाबात राह्यलेलं काय वाईट. पाह्यल का मैनेनं पैसा कसा आत केला आनी कसा दिला मालकाला हाकलून. इंदेच्या पावलावर भारी पावूल ठेवलं बघ मैनेनं.

बाई 2 : चला हला आता नायतर आपलं फाटकं मालक शोधत येयाचे परत आपल्याला... आनी इथंच बैठका मारायचे आपल्यासोबत..

( हसत सगळ्या निघतात. ती शेजारची मुलगी त्या मुलींचं बोलणं ऐकत पाणी भरत आहे.)

( **प्रकाश...**रामभाऊ झाडाखाली बसलाय. गोपीनाथ येऊन त्याच्या शेजारी बसतो. )

गोपीनाथ: माफ कर दोस्ता. लेका नको तिथं घेऊन गेलो तुला आनी धूळधान उडाली तुझ्या संसाराची.. तुझ्या कामधंद्याची.

रामभाऊ : छे रे. तुझा काय दोष? तू एक दिवस घेऊन गेलास. पण नंतर मलाच हवंहवंस वाटू लागलं ना सगळं. आपण खांदा देतो म्हणून आपल्या खांद्यावर पाय ठेवून उंच उडी मारून पुढे सरकतात लोक आणि त्यांच्या झटक्यानं आपण मागे फेकले जातो. सोळा सत्राची कोवळी पोरगी हातात भेटली तर... (स्वतःला सावरीत) तू चिंता नको करू. आपण सावरलो पुन्हा. दुनिया गोल आहे. फिरून पुन्हा आपल्या

जागीच येतो माणूस. बाकी काय...? कसा काय चाललाय बैठकीचा संसार..?

गोपीनाथ: संसार नाय.. बैठकीचा बाजार बोल.. मी नाय जात आता तिकडं. माझ्यापन घराला भगदाड पडून गेलं या बैठकीच्या नादापायी. मी रोज तयारी करून बैठकीला निघायचो.. रोज मस्तमौला आपल्याच नशेत.. बायको रोज सांगत व्हती पोरींकडं लक्ष द्या. पोरी वयात आल्यात. पन मी लक्ष नाय दिलं आनी एक दिवस पोरी आल्या लग्न करून.. अक्खा गाव गोळा झाला होता. माकडवाले जावई.. सगळं संपवू टाकावं वाटत होतं. पन ज्या पोरींना याच हातानी वाढवलं त्यांचं सुख कसं संपवायचं. घराची धूळधान करून टाकली मीच माझ्या हातानं.

(गोपीशेठकडे पाहत रामभाऊ त्याचा हात हातात घेतो. **काळोख..**)

( **प्रकाश...** कला केंद्र.. मंत्री आणि त्याचा पी ए कला केंद्रात बसून दारू पीत मुलींचे नाच पाहत आहेत. पोपट त्यांना पेग बनवून देत आहे. हणम्या व गणू मंत्र्याचे पाय आणि खांदे चेपत आहेत. नाच संपतो. मंत्री

सगळयांना जायला सांगतो. पोपटच्या खुणेने सगळया मुली बाहेर जातात. )

मंत्री : (दारू पीत) ऐ पोपट्या, हे मैना नावाचं काय प्रकरण हाय ?

पी ए : प्रकरण नाही भाऊ तो पूर्ण ग्रंथ आहे. सहजा सहजी लक्षात येण्यासारखा नाही आहे. पण मी काय म्हनतो. आपल्याला कुठं रिसर्च करायचं त्याच्यावर. मी मागवून घेतो. तुम्ही हवी तितकी पानं पालटून बघा कि.

मंत्री: (हसत) दाद्या तू पक्का बाराचा हायस बघ. (दोघे हसायला लागतात. सोनाबाई येते. )

सोनाबाई: सगळं बरोबर हाय ना सरकार ..? पोपट्यानं बरोबर केली ना सगळी व्यवस्था..? आजून काय आदेश आसंल तर सांगा.

पी ए : ते मैना नावाचं पाखरू आहे ना . ते दाखवा की... भाऊना शिकारीचा मूड झालाय. ( हळूच.. दबक्या आवाजात) आणि सोबत जरा आमचं पण बघा. नायतर विसराल आमाला. ( सोनाबाईला स्माइल देतो.)

सोनाबाई: पोपट्या, जा इंदू आनी मैनेला मी बोलावलय म्हनून सांग. (पोपट जातो.) तुमी दोघबी बाहेर थांबा जरा. ( ती हणम्या आणि गणूला बाहेर जायला खुणावते. ते बाहेर जाऊन उभे

राहतात. ) सरकार तुमी करा आराम. तुमी आमची इतकी काळजी घेता तर आमालाबी करु दे की तुमची थोडी सेवा.. (ती बाहेर जाते. पोपट मैना आणि इंदूला घेऊन येतो.)

इंदू : अक्का, बोलावलं का?

सोनाबाई: मंत्री साहेब आलेत आत. आपल्या मैनेची चर्चा त्यांच्यापर्यंत पोचली बरं का. मैने, हि नेते मंडळी खूप कामाला येतात. त्यांना नाराज करून भागत नाय. काय...? इंदू मी बोलली व्हती ना.. हि पोरगी आग लावील. सरकार खुश झालं पायजेत आज. आपले आश्रयदाते हायेत ते. ते नाराज तर थियेटर बंद हे लक्षात असू दे. काय?

इंदू : व्हय अक्का. तू नको चिंता करू. मी हाय सोबत. अक्का. तुझा हात हाय तिच्या डोक्यावर म्हनून सगळं ठीक हाय.

सोनाबाई: जरा चेहरा मोहरा नीट करुन जा.. (दोघी जातात. पोपट मैनाकडे पाहत असतो. सोनाबाईचं लक्ष पोपटकडे जातं.) सोडायला जातो का तिला?

पोपट : व्हय अक्का. आता सोडून येतो. (म्हणत तो सोनाबाईकडे वळतो आणि तिने रागाने पाहताच ) मी ते आपलं ते दार आड करून घेतो ना. तिला कायले सोडायला जाऊ मी आत.

सोनाबाई: ये हनम्या, सरकाराना काय हवं नको ते लक्ष ठेवा जरा..

( दोघे होकारार्थी मान हलविताच ती निघून जाते. )

हणम्या : कलेचा बाजार मांडलाय इथं या रांडांनी.. लेका एव्हडासा होतो तवापासून स्वप्न पाहिलं फडात सोंगाड्या व्हायचं. खूप नाव कमवायचं.. दादू इंदुरीकर.. आपलं दैवत.. कसला सोंगाड्या.. उभ्या आयुष्यात त्याच्यासारखा भारी सोंगाड्या पाह्यला नाय. त्याचा आदर्श घेवून फडात सोंगाड्या म्हनून उभा राह्यलो आनी आता या रांडांची दलाली करीत बसलोय. पहले कलेची जान असनारे.. कलेला प्रोत्साहन देनारे दर्दी लोक थियेटरमध्ये येयाचे आता साले सगळेच रंडीबाज येवू घातलेत.

गणू : आपलं उभं आयुष्य कलेसाठी घालनाऱ्या कलाकाराच्या माथीच अशी शोकांतिका का येते रं? त्याला ना घर मिळत ना पैसा.

हणम्या : पन इथं बैठकी चालवनाऱ्या काल परवाच्या पोरी लोकांना आपल्या खोट्या कहान्या ऐकवून आपले मोठ मोठाले बंगले बांधून राह्यले ना राव. आनी त्यांची दलाली खात बसलेले त्यांचे मायबाप. बरं झालं बाबा आपन लगीन नाय केलं नायतर असला हा ऐशोआराम बघून आपल्या पन मनात

पाल सरकली असती.. बायका पोरींकडून धंदा करवून घेयाची.. चिरा उतरवन्याच्या नावाखाली.

गणू : हनम्या , कला आता राह्यलीच कुठं. पिक्चरच्या हिरोईनीला फिलिम लाईनमध्ये आल्याला दोन चार साल नाय व्हत मोठमोठाले मंत्री त्याना दोन चार फल्याट घेवून देतात सरकारी अनुदानातून. जसा काय तो पैसा त्यांच्या बापानंच कमावून ठेवला व्हता. आनी लेका आपन उपटसोंडे बाबूराव.. हयात गेली.. घर दूर राहिलं.. आमाला काय भेटलं सरकारी अनुदानातून..? साले इथं मजा मारून दारवा पिवून मुततात आनी ते मूत साफ करायला लावतात आपल्याला... काय लायकी कलेसाठी आयुष्यभर बुड झिजवलेल्या आपल्या सारख्या कलाकाराची. रांडांनी बाजार सजवलाय आनी आपन या बाजारात भडवे बनून राह्यलोय... भडवे

( इंदू आणि मैना सजून येतात. दोघे त्यांच्याकडे पाहतात. दोघी नखरयात आत निघून जातात. )

(दारू पीत बसलेल्या मंत्र्यासमोर दोघी जातात. नाचून त्यांचे मनोरंजन करतात. नाच संपल्यावर मंत्री मैनेला जवळ बोलावून बसवितो. इंदू पीए सोबत दुसर्या रुममधे निघून जाते..)

मंत्री :	लय नाव ऐकलं व्हतं तुझं..

मैना :	एक सांगू का ? खोटं नाय बोलनार.  किती आले.. किती गेले.. पन मलाबी तुमाला भेटायची लय इच्छा व्हती.

मंत्री :	असं का...?

(मंत्री खुश होतो. ती त्याला ग्लासने दारू पाजू लागते. **काळोख..**)

( **प्रकाश...** इंदू बंगला.. इंदू आरशात पाहत लिपस्टीक लावत बसली आहे. नानी तिचे केस नीट करीत आहे. भरत रागात येतो. )

भरत:	ए इंदे, आज तुला सोडनार नाय बघ. काय समजून काय राह्यली तू ...? माझ्यासंग चिरा लावलास.. तुझा सगळा खर्च मी भागवतो मग त्या मंत्र्याच्या पी ए सोबत का झोपलीस ?

(भरतचा आरडा ओरडा ऐकून  मैना व बज्या बाहेर येतात.)

इंदू :	ये किती ओरडून राहिला रं  तू? आवाज खाली कर.. खर्च भागवतोस तर त्यापेक्षा जास्त सुख देते मी तुला. आता गुमान इथून गेला नायस तर त्याच पी ए ला फोन लावून

तुला व्हत्याचा न्हवता करून टाकीन. निघ.. आनी जा काय उपटायची ती उपट.

(नानी आपल्या मुलीकडे अभिमानाने पाहत आहे. आणि बज्या मात्र शरमेने मान खाली घालतो.)

इंदू : ये नाने, चाय आन एक कडक. ये तान्या, या भरत्याला बाहेरचा रस्ता दाखव की मान खाली घालून का राह्यला तू?

( भरत रागाने निघून जातो. )

इंदू : पाह्यलस का मैने...? पैसा कमावला.. आता प्रतिष्ठा हवी. आपल्या मानेपर्यंत कोनाचेबी हात पोचता कामा नये. ( तिच्या हातातून आरसा आणि लिपस्टीक घेते. )

मैना : जीजे , इथला हर एक मंत्री तुझ्या ह्या भनीचा गुलाम व्हईल बघ. (आरशात पाहून लिपस्टिक आपल्या ओठावर लावते. ) कोनती गोष्ट कशी आनी किती वापरायची चांगलं माह्यतेय मला.. (मैना ती लिपस्टिक फेकते आणि इंदूकडे पाहत हसते.)

नानी : पोरीनो, डोळं भरिलं माझं... एकीला लपवावी आनी दुसरीला दाखवावी. लय  गुनाच्या माझ्या पोरी. चला दृष्ट काढते आधी दोघींची..

(नानी त्यांना घेऊन रुममधे जाते. कमरेवर हंडा घेऊन येत असलेली ती शेजारची गरीब मुलगी रस्त्यात पडलेली लिपस्टिक उचलते आनी हंडा खाली ठेवून पाण्यात पाहत ती लिपस्टिक ओठांना लावते आणि स्वतःला पुन्हा पाण्यात  पाहू लागते. तिचा घामेजलेला फाटका गरीब बाप  येतो आणि तिला पाहतो.)

मुलगी : तात्या, माझा पन चिरा लाव की मैनेसारखा.. मग आपन पन इथंच या इंदूच्या बाजूला मोठाला बंगला बांधू. मग तुला पन मजुरीला भटकायला नको आनी आमाला बी उपाशी झोपायला नको.

( बाप रागाने तिला मारायला हात उगारतो. ती शांतपणे त्याच्या डोळ्यात पाहत असते. तो हात खाली घेतो. त्याचे डोळे भरतात. मान खाली खालून तो विंगेत निघून जातो. बॅकग्राऊंड म्युझिक.. आर्त आलाप ती पुन्हा पाण्यात पाहत तिथेच बसते. **हळूहळू काळोख..)**

( **प्रकाश...** मैना सफेद साडीमधे खंद्यावर शॉल घेऊन भाषण करीत आहे. मंत्री, पी ए, इंदू सगळे सोबत आहेत. )

मैना : नमस्कार, मी मैना बापू भंगारदिवे. मी आजवर आयुष्यभर फक्त कलेलाच जपलं.. कलेशिवाय दुसरं कायबी केलं नाय.. कोनत्याबी पर पुरुषाला मी माझ्या अंगाला स्पर्श करू दिला नाय.. कधी कोना गरिबाचा पैसा लुबाडला नाय.. आतापर्यंत कलेचीच सेवा केली. आता समाजाची सेवा करायची हाय. मंत्री सायबानी 'कला रत्न' पुरस्कार आनी त्यांच्या पार्टीचं इलेक्शन तिकीट देवून माझ्यासारख्या कलाकाराचा नाय तर कलेचा गौरव केला हाय. आता हा जन्म.. उरलेलं आयुष्य फक्त गोरगरिबांच्या सेवेला अर्पन करीन. ( मैना चा हारतुरे देऊन सत्कार होत आहे. उपस्थित सगळे मोठमोठ्याने टाळया वाजवीत आहेत. V/O (आवाज) सुरु होतो…)

आवाज : बाजार मांडलाय कलेचा.. तुम्ही बाजार मांडायला दिलात कि कलेचा बाजार मांडला जाणारच.. कलेचा सन्मान करा .. स्त्रीचा सन्मान करा आणि आधी त्या स्त्रीला सन्मान देण्यासारखं बनवा.. कारण ती प्रत्येक स्त्री समस्त स्त्री वर्गाचं प्रतिनिधित्व करते.. लोकांच्या घामाचा, कष्टाचा

पैसा.. शासन दरबारी जमा होतो.. कलागुणांना वाव मिळावा म्हणून करोडो रुपये उधळले जातात कला केंद्राच्या नावाखाली.. डोळे बंद करून त्याची उधळणूक  करू नका...

तुमची बैठक जमविताना लोकांना देशोधडीला लावू नका.

तुमची बैठक जमविताना लोकांना देशोधडीला लावू नका...

(**हळूहळू काळोख** पसरतो..)

( **प्रकाश...** नवीन बैठक लागलेली आहे. काही मुली लावणी करीत समोर बसलेल्या नविन पैसे उडविणारया लोकांसोबत मस्ती करीत आहेत. हळूहळू पडदा पडू लागतो. )

*THE END*

## अर्पणपत्रिका

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणार्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणार्या

**‘ ई साहित्य प्रतिष्ठान’**

या प्रकाशन संस्थेस

सदर पुस्तक

समर्पित.

**संदीप शांताराम सुर्वे.**

मुंबई.